# झुंज एका वादळाशी

लग्नानंतर ती दर्शनाला काशीला गेली. तिथून परतल्यावर तिच्या गर्भात अंकूर वाढतोय याची खात्री पटली. नऊ महिने तिने काशी विश्वेश्वराची श्रद्धेने भक्ती केली. प्रत्येक महिन्यात काशीहून येणारा प्रसाद तिच्या श्रद्धेला तथास्तू म्हणायचा. मार्च मधे येणाऱ्या शिवाच्या नवरात्रात रत्न म्हणावं अशा पुत्राला तिने जन्म दिला. तत्क्षणीच तिच्या मुखातून 'शिव' हेच नाव बाळाकरिता उच्चारल्या गेले. सौ. योगिता शिवची आई झाली. नात्यातील सर्वांना बढती मिळाल्याचा आनंद झाला.

मातृत्व आणि बाळाच्या बाललीला ह्याहून स्त्रिया आयुष्यात दुसरं कुठलचं मोठं सुख नसावं. शिवच्या प्रत्येक लीला तिला सुखावत होत्या. सतेज गोरा वर्ण, सोनेरी केस गुलाबी ओठ, बोलके घारे डोळे, ठेंगणा बांधा असं हे ईश्वराकडून आलेलं लोभस रूप न्याहाळतांना त्याच्या आईसह सगळेच आनंदात होते. मी तर त्याला गंमतीने खेळायती बाबूच म्हणायचे. प्रखर बुद्धीमत्ता, कुठल्याही गोष्टीची कारणमिमांसा करणं, अनुकरण करून कृतीत आणणं हे गुण भगवंताने त्याला बाढीस स्वरूपात दिले की काय असेच वाटायचे.

घराच्या अंगणात खेळणाऱ्या, बागडणाऱ्या शिवला शाळेचे पटांगण खुणावू लागले. शालेय प्रवेशासाठी त्याची मुलाखत झाली. त्याच्या चाणाक्ष बुद्धीने आणि हजरजबाबीपणाने त्याने सर्वांची मने जिंकली. सगळ्यांच्या तोंडून शिवचाच विषय रंगवला जायचा. शाळेच्या आलेखात त्याचे नाव दाखल करतांना गणेशाचा आशीर्वाद मिळवलेल्या त्याच्या बुद्धीमत्तेची चुणुक लक्षात घेऊन त्याच्या बाबाकडून अथर्व पराग पंडीत असे नाव नोंदवल्या गेले. त्या दिवसापासून शिव पंडीत हा कागदोपत्री अथर्व पंडीत झाला. आईचा शिव आणि बाबांचा अथर्व शालेय जीवनात रूळायला लागला.

२ जानेवारी २००५ रविवार दिवस आज शिव आणि त्याच्या आईला तिच्या मैत्रीणीकडे तिच्या मुलाच्या वाढदिवसाला जायचे होते. ते दोघेही सकाळपासून खुश होते. नवीन कपडे घालून तयार झालेला शिव आनंदानेच गोंडस दिसत होता. शेजारची बाई म्हणाली दृष्ट काढ हो त्याची! आपल्या लोभस रूपाने, चुणचुणीत बोलघेवड्या स्वभावाने त्याने सर्वांकडून आपले कौतुक करवून घेतले.

मुलांची जात ही जात्याच खोडकर, खट्याळ, व्रात्य असतेच हे भगवान श्रीकृष्णापासून आपण बघतोच आहे. शिवही त्याला अपवाद नव्हता. डोक्यात तेल घालून त्याची आई सतत त्याच्यावर पहारा देत असायची. पण येणाऱ्या प्रत्येक नव्या वर्षांचं कॅलेंडरचं पान, त्यातील प्रत्येक महिना, प्रत्येक तारीख प्रत्येक वार प्रत्येक वेळ, क्षण अन् क्षण विधात्याने आपल्या हातात ठेवलेला त्याला नियती हे गोंडस नाव दिलं

काय झालं हे कळायच्या क्षणार्धात शिवने आईचं पकडलेलं बोट सोडलं आणि नुकताच कचरा जाळून राख झालेल्या भल्या मोठ्या कचराकुंडीत शिवने उडी घेतली. वीज कडाडावी तशी त्याच्या किंचाळीचे, आक्रोशाचे सूर खामगावात दूरवर उमटले. दोन्ही पायाचे तळवे नव्हे अर्धे पायच गरम राखेत घट्ट चिपकून बसले. लोकांची गर्दी जमली. त्याच्या आईने लोकांच्या मदतीने प्रयत्नाने कचराकुंडीतून वर उचलले. तेव्हा पायाचे मोजे सहज काढून टाकावे तसे त्याचे तळव्याचे मांस बोटसहित गळून पडले.

वेदनेचे वादळ त्याच्या आईच्या काळजात उठले. त्या काळजालाच ती घट्ट धरून होती. तावडतोब खामगावच्या दवाखान्यात नेले धनुर्वाताचे इंजेक्शन देऊन प्राथमिक उपचार झाले. अकोल्याच्या नामांकित दवाखान्यात हलविण्यात आले. डॉ. उपचार चालूच होते. शिवच्या तोंडून अमिताभ, अमिताभ असे काहीसे शब्द ऐकू आले तेव्हा शिवच्या आईच्या लक्षात आले की अँग्री यंग मॅन अमिताभ बच्चन यांचा सिनेमा बघतांना त्याने घेतलेल्या उडीचे अनुकरण वा आदर्श त्याच्या मनावर कोरल्या गेले आणि तेच त्याने कृतीत उतरवण्याचा प्रयत्न केला.

उपचाराला योग्य प्रतिसाद मिळत नव्हता म्हणून डॉ. नी मुंबईला जाऊन उपचार करण्याचा सल्ला दिला. प्रकृती दिवसेंदिवस गंभीर वळण घेत होती. मुंबईच्या भायखळा येथील मासिना हॉस्पीटलला भरती केले. डॉ. वर्तक यांनी उपचाराला सुरुवात केली. प्रयत्न करणे आपल्या हाती बाकी सगळी ईश्वरीइच्छा असे सांगून डॉ. नी आपलं कर्तव्य पार पाडलं. त्या क्षणी शिवच्या आईबाबांची काय अवस्था झाली असेल? पायाखालची जमीन सरकली, काळजाचा ठोका चुकला, दुःखाचा डोंगर कोसळला त्यात आम्ही दबून गेलोत.

ते गेठले, कोरडे झालेत. कोण कोणाला हिम्मत देणार, कोण कुणाचं सांत्वन करणार ?

क्षणार्धात दोघांच्या नजरा एकमेकांवर खिळल्या नजरेची भाषा बरेच काही बोलून गेली. दुःख, कारुण्य, प्रेम, भिती वात्सल्य या साऱ्या भावनांचा संगम अश्रूंच्या एकेक थेंबातुन ओघळू लागला. सारं सुन्न झाल्यासारखं वाटलं. ~~एकेक~~ प्रत्येक क्षण युगासारखा वाटू लागला. एकेका क्षणांनी नियतीशी हातमिळवणी करुन त्यांची क्रूर थट्टाच मांडली होती. वाटलं सगळचं संपलं. असं म्हणतात जेव्हा असं वाटतं तेव्हा तीच खरी वेळ असते नवीन काहीतरी सुरुवात व्हायची. शिवची आई स्वामी समर्थांची निस्सीम भक्त होती. तिचा नामस्मरणाचा अखंड धावा चालूच होता. तिच्या कानात हलका आवाज आला 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे.' तिला बळ मिळाल्यासारखं वाटलं. तिच्या दुःखावर कुणीतरी फुंकर घातली आणि वेदनेला सुखाचा गारवा मिळाला असेच वाटले. डॉ. शिकस्तीचे प्रयत्न चालूच होते. एक, दोन दिवसाआड त्याच्या पायावर शस्त्रक्रिया — होत होत्या. बॅट, बॉलनी क्रिकेट खेळणारा शिव दिवस, रात्र शस्त्रांशीच खेळू लागला. चॉकलेट, गोळ्या, बिस्कीट, चिप्स, चे पॅकेट खाण्याच्या वयात औषधांच्या गोळ्या, कॅपसुल, इंजेक्शन चे पाकीटं खाण्याची वेळ आली.

मस्ती करणारा खोडकर शिव शांत, समंजस झाला त्याच्या बालपणानी, कायमची रजाच घेतली. बालपणाला पूर्णविराम देऊन अवकाळी पाऊस पडावा तसा अचानक शिव मोठा झाला. दिवस, रात्र एकच भासत होता. झोप ~~ह्या शब्दाला पारखं झाले होते.~~ ह्या शब्दाच्या विसरच पडला होता. निद्रादेवी रुसून बसली होती. भला मोठा दवाखाना त्यातही हा 'बर्न वार्ड', सतत वेदनेचे, विव्हळण्याचे हुंकार प्रत्येक कोपऱ्यातुन निनादत होते. रात्रीच्या काळोखात हे सुर भेसुर वाटत होते. दुःखाचे रंग आणखीनच गडद झाल्यासारखे भासायचे.

अशातच एक पन्नास वर्षीय गृहस्थ कंपनीत स्फोट होऊन भाजल्याने पूर्ण जखमी झाले होते. मृत्युशी त्यांचे दोन हात चालले होते. त्यांचा 'पाणी पाणी' असा क्षीण आवाज शिवच्या आईला एक आला. त्या काळोखातील वेदनेला घट्ट मिठी मारुन मोठ्या हिमतीने ती नर्सला

शोधायला गेली. त्या कुठेतरी लांबवर होत्या. परत 'पाणी, पाणी' ह्या शब्दाने तिच्याच काळजाचं पाणी पाणी झालं. तिने चमच्याने त्या गृहस्थाच्या मुखात पाणी घातले. त्याने कृतज्ञतेने तिच्याकडे बघितले. काहीशी ओठांची हालचाल केली. आणि तासाभऱ्यात त्या व्यक्तीने आपली जीवनयात्रा संपवली. ह्या घटनेने दुःखाचं पारडं अधिकच जड झालं. नकारात्मक विचारांच्या ज्वाळा मनात धगधगू लागल्या. जखमेवरची खिपली काढून भळाभळा रक्त वहावं असंच जाणवलं. शिवच्या आईची हिम्मत पुरती खचली. तेवढ्यात शिवचे बाबा तिला धीर देत म्हणाले. खचू नकोस तुझ्या हातून पुण्याचं काम घडलं. आईला परत पाठबळ मिळालं. स्वामी समर्थ पाठीशी आहेत असाच भास झाला.

हॅन्डसम पर्सनॅलिटीचे शिवचे बाबा अभियंता म्हणून पाटबंधारे विभागात कार्यरत आहेत. ऑफिसमधे त्यांचा प्रचंड दरारा आहे. जन्मभुमी आणि कर्मभुमी विदर्भातल्या ~~नाम्मु~~ नागपुरची असल्याने खाण्यापिण्याच्या सवयी ते नागपुरची, रांगडी भाषा त्यांच्या नसानसात भिनली आहे. वेळप्रसंगी कुणाशीही दोन हात करावेत अशी त्यांची खंबीर वाणी आहे. पण पोटच्या पोराच्या वेदनेने हा पहाडासारखा बाप पुरता कोसळला होता. अश्रू लपवून दुःखाचे घोट गिळत होता. पचवत होता.

शिवच्या आईसमोर हिमतीची ढाल आणि जिद्दीची तलवार ह्या दोनच शस्त्रांनी त्यांना ही लढाई जिंकायची होती. दिवसामागून दिवस जात होते. शिवचे आजोबा (आईचे वडील) हे मराठीचे शिक्षक होते. ते रोज शिवला कथा सांगत हिमतीचे, धैर्याचे, संयमाचे बाळकडू या कथातून त्याला सहज मिळत गेले. कोवळ्या मनावर हे संस्कार रुजल्या गेले. त्याचे आई, बाबा त्याला गाणी, गोष्टी, नकला सांगून तासनतास त्याच्याशी खेळून त्याच्या जखमेच्या वेदनेवर पांघरुण घालायचे. त्याचं खळाळून हसणं सगळ्यांसाठी संजीवनीचं काम करीत.

दुःखाला हरवण्यात छंद फार महत्त्वाचे ठरतात, ते औषधांचे काम करत होते

नित्याने उगवणाऱ्या सुर्याच्या किरणांसमवेत आशेच्या किरणांची प्रतिक्षा करायची, त्याची आस लावून एक एक दिवस पुढे चालायचा. ~~हे नित्यक~~

शिवच्या शरीराचं मांस काढून त्याच्या तळव्याला लावलं. आता धोक्याची घंटा टळली होती. परंतू दोन्ही पायांची बोटे कायमची गमवावी लागली. सामान्य मुलासारखे त्याचे चालणे, धावणे, फिरणे, खेळणे ह्यावर बंधने येणार होती.

दिवसामागे, आठवडे, महिने उलटत गेले. होळीचा दिवस होता. पुरणपोळी खाऊन रंग खेळण्यासाठी शिवचा हट्ट होता. इतर रुग्ण देखील घरच्या होळीचे चित्र रंगवत होते. बालहट्ट हा विधात्यालाही पुरवावाच लागतो. बाजूचा मेडिकल स्टोअर्स वाला रोज औषधं, गोळ्या यांच्या वजनदार पिशव्या घेऊन यायचा. तो आजही आला. पिशवीचे वजन एकदम जड झाल्यासारखे वाटले. बघतो तो त्यात एक मोठा डबा पुरणपोळींनी गच्च भरला होता. शिवच्या चेहऱ्यावरचा आनंद टिपून ठेवण्यासारखा होता. त्याच्या आईने सगळ्यांना पुरणपोळी देऊन सगळ्यांचे तोंड गोड करून फार मोठा आनंदाची देवाण घेवाण केली होती. ती होळी कायमचं तिच्या स्मरणात राहिली. कारण अनेकांच्या वेदनांची होळी त्या दिवशी झाली होती.

डॉ. हे परमेश्वराचं दुसरं रूप असतं. त्या रूपानी शिवला नवं आयुष्य मिळालं होतं. साडेतीन ते चार महिन्याचा दवाखान्याचा प्रवास अनेक कडू-गोड आठवणींची शिदोरी, अनुभवाचा खजिना घेऊन शिव आणि त्याचा परिवार घरी परतणार होता. या प्रवासात प्रत्येकाशी एक नातं निर्माण झालं होतं

नियमानुसार लाखाचं बील निघालं, पण त्याच्या लाख मोलाचा जीव वाचल्यामुळे पैशातल्या लाखाची किंमत शून्य होती.

या काळात आप्त, नातेवाईक ह्यांनी फार मोठ्या प्रमाणात आर्थिक भार उचलला. मानसिक पाठबळ दिलं प्रत्येकजण आपआपल्या परीने प्रयत्न करत होता.

नातेसंबंध किती आणि कसे महत्वाचे ठरतात आणि ते का टिकवून ठेवायचे असतात हे येणारी संकटंच शिकवून जातात. शिवच्या ह्या परिस्थितीत सासर, माहेरचे मंडळी खंबीरपणे तिच्या पाठीशी उभे होते.

त्यांच्या शेजारी एक मुसलमान कुटुंब रहात होते. त्यांचा शिव हा अत्यंत लाडका होता. शिवच्या या काळात त्या कुटुंबाने शिवसाठी कठोर रोजे केले. शिव नाव असल्याने महादेवाच्या मंदिराच्या बाहेर उभे राहून शिवसाठी प्रार्थना केली. बरा झाल्यावर नवस रुपात केलेली प्रार्थना पूर्ण केली. भावनेपुढे धर्माचा विरोध आपोआपच गळून पडला. भावनेचा विजय झाला.

रक्षाबंधनासारख्या सणाला शिव ने त्यांच्या मुलींकडून राखी बांधून घेतली. भावा बहिणींचं नवं नातं तयार झालं.

हळूहळू शिव मोठा होऊ लागला. विशिष्ट प्रकारचे सोल असलेले बूट घालूनच त्याला चालायचे होते. कठीण वस्तूंचा स्पर्श टाळायचा होता.

शिवचे शाळेचे एकेक वर्ष पुढे, पुढे सरकत होते. भगवंत स्वत:वर कुठलाच दोष येऊ देत नाहि. पायाने कमजोर असलेला शिव अभ्यास, गाणे, वक्तृत्व ह्या सगळ्यात पुढेच होता. शाळेत सर्वांचा लाडका होता.

प्रत्येक महिन्याला मुंबईला जाऊन डॉ. कडे तपासणी करुन यायचेच होते. या काळात 'तळहातावरच्या फोडाप्रमाणे जपणे' हाच वाक्प्रचार शिवच्या आईच्या बाबतीत तंतोतंत लागू होतो. ती स्वत:ला विसरूनच गेली. शिव हिच दुनिया झाली होती.

प्रत्येक क्षणाचे आव्हान तिनी स्विकार ईश्वरी कृपेचा आधार घेऊन ते पेललं.

आलेल्या वादळाशी झुंज दिली. वादळ शांत झालं पण तिची झुंज अविस्मरणीय ठरली.

शिवच्या प्रत्येक आनंदाच्या क्षणी ती ओल्या डोळ्यांनी हसत होती आणि कधी हरला, निराश झाला तर ती खंबीर बनत होती.

गितेत लिहलेलं वचन आहे.
'निराश होऊ नका, कमजोर ही तुमची वेळ असते तुम्ही नाही'
योगिता या तिच्या नावात गिता आहे. गितेतलं हे वचन ती जगली.

सांगायला अभिमान वाटतो की जिनं आपल्या मुलासाठी हा संघर्ष केला ती मासी मामेबहीण आहे.
मामाची मुलगी म्हणून ' मामेबहीण
बाकी आमच्या पिढीतील ती सर्वांची मोठी ताई आहे.
कौतुक करवून घ्यायचं असो, हक्कानं एखादी वस्तु मागायची असो, कठीण प्रसंगी एखादा सल्ला घ्यायचा असो.
आजारपणात सेवासुश्रुषेला आधार मागायचा असो.
आमची पहिली धाव असते ती ताईकडेच. कारण ईश्वरी शक्तीने, आणि भक्तीने ती कुठल्याही समस्येवर मार्ग काढणार देव तिचं ऐकतोच हा आमच्या तिच्याप्रती विश्वास आहे.
ह्या विश्वासाला ती तेवढ्याच भावनेने, प्रेमाने, कर्तव्याने जपते आहे.

शिव शाळेत परिक्षेत गुणवत्ता यादीत अव्वल आला सर्वत्र त्याचे सत्कार सोहळे झाले. त्याच्यासहीत आई, बाबा, आप्त नातेवाईक, शाळा ह्या सगळ्यांचे नाव सर्वत्र चमकवले.

उत्तम गाण्याच्या सुरांनी अनेकांशी त्याचे ~~सूर~~ सुर जुळलेत, उत्कृष्ठ गिटार वादनाने अनेकांना रिझवले.

नकला करून सगळ्यांना मनसोक्त हसायला लावून स्वतासह इतरांच्या दुःखालाही दूर पळवायला भाग पाडलं. मी लढाई कशी जिंकली याचं रसभरित वर्णन करतांना शिवलेल्या जखमा आनंदाने दाखवु लागला.

गाडी चालवणे, क्रिकेट खेळणे, सायकल चालवणे हे सगळं ~~करतांना~~ करायला त्याचे पाय सक्षम होऊ लागलेत -

आज शिव विश्वेश्वरैया इंस्टिट्युट नागपूर येथे द्वितीय वर्षाला आहे. देखणा सुकुमार, राजबिंडा शिव सर्वांना खिळवुन ठेवणारा व्यक्तिमत्वाचा धनी आला. कुठल्याही गॅदरिंग, गेट्टुगेदर चा केंद्रबिंदु होऊन स्वतः नाचुन इतरांनाही पाय थिरकवायला लावणाऱ्या शिवकडे बघुन म्हणावेसे वाटते. पंगुं लंघयते गिरिम्

सौ. वेदश्री विकास देशपांडे
जी. टी. एन. इंडस्ट्रिज सावनेर
जि. नागपूर
मो. नं. 9822211335